**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
**e-mail:-** msboardnagpur@gmail.com **www.nagpureduboard.in**

पत्र क. : नाविमं / प.उ.मा. /678
नागपूर, दि. 18 / 02 / 2025

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
नागपूर विभाग नागपूर.

**विषय :–फेब्रुवारी–मार्च 2025 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. 10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू तसेच एन.सी.सी. स्काऊट गाईड विद्यार्थ्यांच्या प्रस्तावाबाबत.**

**संदर्भ :–1) शासन निर्णय क्रमांक– उमाशि –2015 / प्र.क्र. 262, एस.डी. 2 दि. 20 / 12 / 2028**
**2) शासन शुध्दीपत्रक क्रमांक– उमाशि –2015 / प्र.क्र. 262, एस.डी. 2 दि. 25 / 01 / 2019**
**3) राज्य मंडळ / परीक्षा– 7 / 510 / दि. 06 / 02 / 2025.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णयानुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी. स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीने वाढीव गुण देण्यात येतात.

शासन निर्णयानुसार जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेकडून क्रिडा प्रस्ताव तसेच एन.सी.सी. स्काऊट गाईड इत्यादी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कडून विभागीय मंडळाकडे दि. 30 / 04 / 2025 पर्यंत सादर केले जातात. तथापि शैक्षणिक वर्ष 2024–25 या वर्षात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) च्या परीक्षा नेहमीपेक्षा 10 दिवस आधी आयोजित करण्यात आल्या असून सदर परीक्षांचा निकाल दि. 15 मे 2025 पर्यंत जाहीर करावयाचा आहे. करिता जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्याकडून क्रिडा प्रस्ताव दि. 15 / 04 / 2025 पर्यंत विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल.

तसेच एन.सी.सी.स्काऊट गाईड प्रस्ताव विभागीय मंडळाकडे प्रचलित पध्दतीने दि. 15 / 04 / 2025 पर्यंत स्विकारण्यात येईल, तरी सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंद घेवून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी :–**

1) सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद, (भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला कळविण्याचे कार्यवाहीस्तव.